प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींना नोकरीसाठी देण्यात येणारे प्रमाणपत्र प्रकल्पग्रस्त व्यक्तींवर अवलंबून असणा-या व्यक्तीत कायदेशीर दत्तक पूत्राचा समावेश करण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:आरपीए ४७९७/प्र.क्र.४४/र-१,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २० मार्च, १९९७.

संदर्भ :-
१] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एईएम १०८०/३५/१६-अ, दिनांक २१/१/१९८०
२] शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक आरपीए ३९९३/प्र.क्र.१७८/र-१ दिनांक १४/९/१९९४
३] शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक आरपीए ३९०३/प्र.क्र.१७८/र-१, दिनांक १५ मे १९९५
४] शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक आरपीए ३९९५/प्र.क्र.१८३/र-१, दिनांक २२ मे, १९९६.

शासन निर्णय :-
= = = = = =

शासनाच्या पुनर्वसन धोरणानुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबून असणा-या व्यक्ती त्यांना शासकीय सेवा प्रवेशासाठी तारतम्य दाखवून नोकरीत प्राधान्य देण्याबाबत सवलत देण्यात आली असून " प्रकल्पग्रस्त व्यक्तीवर अवलंबून असणा-या व्यक्ती " या संज्ञेच्या व्याख्येत कायदेशीर दत्तकपूत्राचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. कायदेशीर दत्तक विधान झाल्यावर " दत्तक पुत्र " व औरस पुत्र हे कायद्यान्वये सारखेच ठरत असल्याकारणाने शासन आता असे आदेश देत आहे की, प्रकल्पग्रस्ताने मागणी केल्यास नोकरीसाठी आवश्यक ते देय असलेले प्रमाणपत्र कायदेशीर दत्तक पूत्राच्या नांवे देण्यात यावे.

हे आदेश विधी व न्याय विभाग व सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

अवर सचिव, महसूल व वन विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रति
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,